। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २३७ वा । बुधवार दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पोलीसात शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत समर्थ रा. धोत्रे ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी धोत्री येथील आरोपीचे शेतातील बांधावर असलेल्या झुडपात लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक तलवार अंदाजे ५००किंमतीची ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला तामलवाडी पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे- उमेश सुरेश माने, नेमणुक पोलीस ठाणे तामलवाडी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह भा.न्या.सं.कलम १३५ मपोका अन्वये तामलवाडी पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलवरुन पडून झाले मृत्यु

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत खंडू , व सोबत मयत नामे- अनिकेत पवन ओव्हाळ, वय २६ वर्षे, दोघे रा. कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव दि.३०.११.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान बावी ते तेरखेडा जाणारे रोडवर खामकरवाडी शिवारातील आण्णा प्रल्हाद शिंदे यांचे शेतात समोर माणीकदंड टी पॉईट जवळ खंडू त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही चालवून मोटरसायकलवर पाठीमागे बसलेले अनिकेत ओव्हाळ हे खाली पडून गंभीर जखमी होवून मयत झाले. फिर्यादी नामे-पवन मच्छिंद्र ओव्हाळ, वय ५३ वर्षे, रा. कडकनाथवाडी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१, १०६(१), १२५ (अ), १२५ (ब) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अरुण रा. अणदुर ता. तुळजापूर जि.धाराशिव हे दि.०१.१२.२०२५ रोजी जयमल्हार हॉटेलच्या बाजूला झाडाखाली फुलवाडी शिवार येथे अंदाजे १४,३०० किंमतीची १४३ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर पमाबाई रा.अक्कलकोट रोड नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.०१.१२.२०२५ रोजी अक्कलकोट रोड नळदुर्ग येथील पिस्के यांचे देशी दारुच्या दुकानाचे बाजूला अंदाजे ३,६०० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

## पुण्याईशिवाय सद्गुरू भेट अशक्यच, पठणासह गीतेचे आचरणही महत्त्वाचे
## श्यामराव दहिटणकर यांचे गीता जयंतीनिमित्त ऑनलाइन मार्गदर्शन



धाराशिव(प्रतिनिधी)- मनुष्य जन्म सार्थकी लावण्यासाठी नियमित गीता पठणासह गीतेचे आचरण फार महत्त्वाचे आहे. गीतेतील उपदेशानुसार माऊलींनी दाखवलेल्या मार्गावरून प्रत्येकाने चालावे. गीतेतील विचार आत्मसात केल्यास आपल्या पुण्याईच्या जोरावर भगवंताची भेट होईल. सद्गुरूंचा लाभ होईल, वेदांचे सार उपनिषदात आहे, उपनिषदांचे सार गीतेत आहे, त्यामुळे गीता, ज्ञानेश्वरी शास्त्रेश्वर आहे. त्यापुढे कोणतेही शास्त्र नसल्याचे स्वतः ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितल्याचे प्रतिपादन श्यामराव दहिटणकर महाराज यांनी केले. सोमवारी (दि. १) गीता जयंतीनिमित्त धाराशिव शहरातील बालाजी मंदिरात रामकृष्ण मंडळ आणि एकादशी ग्रुपतर्फे गीता जयंती साजरी करण्यात आली. या वेळी गीतापठण व गीताजयंतीच्या कार्यक्रमात त्यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले.

गीता पठणाच्या सुरुवातीला गीता ग्रंथाच्या पूजन मनीषा गोवर्धन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी १७५ महिला, १५ पुरुष भक्तांनी सकाळी ११.१५ ते दुपारी १ वाजेपर्यंत एका सुरात गीतापठण केले. त्यानंतर श्यामराव दहिटणकर यांनी तब्येत बरी नसल्यामुळे ऑनलाइन गीता पाठकांना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी एकादशी ग्रुपतर्फे वर्षभरात २४ एकादशीला २२५० पेक्षा जास्त गीतापठण केल्याचे सांगितले. या वेळी त्यांनी साधकांना गीता पठणात सातत्य फार महत्त्वाचे सांगून असाध्य ते साध्य होऊ शकते. यानंतर किसन सारडा यांनी सर्व भाविकांना फलाहार वाटप केले. गीता पठणासाठी पुरुष भक्तांत राजाभाऊ जगताप, डी. बी. कुलकर्णी, डी. आर. कुलकर्णी उपस्थित होते. महिलांमध्ये मनीषा गोवर्धन, संध्या घाडगे, शालिनी पाठक, नुकसा मसलेकर, सुनिता दहिटणकर, नलिनी मालखरे, सुवर्णा कुलकर्णीसह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

वेदांचे सार उपनिषदात उपनिषदाचे सार गीतेत गीता ज्ञानेश्वरी हे शास्त्रेश्वर आहे.

यापुढे कोणतेही शास्त्र नसल्याचे स्वतः ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितले आहे, असे श्यामराव दहिटणकर महाराज यांनी सांगितले. वेदांचे सार उपनिषदात आहे. उपनिषदांचे सार गीतेत आहे. त्यामुळेच गीता ज्ञानेश्वरी हे शास्त्रेश्वर आहे, त्यामुळे यापुढे कोणतेच शास्त्र नसल्याने ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितल्यामुळे प्रत्येकाने गीता पठण करुन गीतेतील विचार आत्मसात करावे, असे आवाहन केले.



तुळजापूर (खुर्द) येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.३ येथील मतदान केंद्राला जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी भेट दिली व मतदान प्रक्रियेची पाहणी केली.

## जिल्ह्यात २ ते १४ डिसेंबरपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यात सुरू असलेल्या नगरपरिषद व नगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तसेच संभाव्य आंदोलनात्मक कार्यक्रमांचा विचार करून,जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू केला आहे.हा आदेश २ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १ वाजेपासून ते १४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) लागू राहणार आहे.

निवडणुकांदरम्यान विविध पक्ष, संघटना, गट यांच्या कार्यक्रमामुळे मोठी गर्दी होण्याची,पक्षांतर, गटबाजी,आरोप-प्रत्यारोप वाढण्याची आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेती व घरांचे नुकसान झाले आहे.त्यामुळे पिकविमा, नुकसानभरपाई, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागण्यांसाठी अचानक धरणे, मोर्चे, उपोषण, आत्मदहन, तालठोको, रास्तारोको इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.या सर्व पार्श्वभूमीवर अपर जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी करताना खालील बाबींवर मनाई केली आहे:

प्रतिबंधात्मक आदेशानुसार पुढील बाबीस मनाई करण्यात आली आहे.यामध्ये शस्त्र, सोटे,काठी,तलवार,बंदूक जवळ बाळगणे. शारीरिक इजा होण्यास कारणीभूत ठरतील अशी लाठ्या,काठ्या किंवा तत्सम वस्तू बाळगणे.कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ ठेवणे.दगड,क्षेत्रपणास्त्रे, फोडणी किंवा फेकावयाची उपकरणे तयार करणे किंवा बाळगणे.आवेशी भाषणे, अंगविक्षेप,विडंबन,असभ्य वर्तन,प्रक्षोभक कृती किंवा सामाजिक सलोखा व सुरक्षिततेस बाधा आणणाऱ्या वस्तू, चित्रफलक जवळ बाळगणे. सार्वजनिकरीत्या घोषणा देणे,गाणी म्हणणे,वाद्य वाजविणे किंवा संविधानविरोधी किंवा देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण करणारी कृत्ये करणे.व्यक्तींच्या किंवा शवांच्या प्रतिमा प्रदर्शित करणे.पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावास परवानगीशिवाय एकत्र येणे किंवा मिरवणूक/मोर्चा काढणे.या बाबींचा समावेश आहे.

**ज्या घटनांना आदेशातून सूट आहे**

यामध्ये अंत्ययात्रा,धार्मिक विधी,लग्न समारंभ,सामाजिक सण,शासकीय कार्यक्रम,शासकीय सेवेत तैनात कर्मचारी,सिनेमागृह,रंगमंच यांसारखी सार्वजनिक करमणूक स्थळे यांचा समावेश आहे.

प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना कोणत्याही सभा,मोर्चा,मिरवणूक किंवा निवडणूक प्रचार सभा घेण्यासाठी पोलीस अधिक्षक धाराशिव किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी (धाराशिव,तुळजापूर, उमरगा,कळंब,भूम) यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे.आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## बारदाण्यासह टॅगमुळे केंद्रांवरील सोयाबीन खरेदी मंदावली: शेतकऱ्यांची उपस्थिती अनिवार्य, अन्यथा सोयाबीन विक्री करता येणार नाही

धाराशिव (प्रतिनिधी)-जिल्ह्यात सोयाबीन खरेदीसाठी दि. १६ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. परंतु १५ दिवसांतच बारादाणा संपल्याने नाफेडच्या धाराशिव जिल्ह्यातील २० सोयाबीन खरेदी केंद्रांपैकी धाराशिव , तुळजापूरसह अन्य काही खरेदी केंद्रांवर बारदान्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. काही केंद्रांवर बारदाना संपल्याने तर काही केंद्रांवर टॅग नसल्याने सोयाबीन खरेदी बंद आहे. नाफेडकडून नवीन बारदाना येईपर्यंत सोयाबीन खरेदी बंदच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता बारादाणा कधी येणार? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. नाफेडने बारदाण्यासाठी वेळीच पाठपुरावा करून बारदाणा मागवण्याची गरज आहे. जिल्ह्यात आत्तापर्यंत १८,००० शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. धाराशिव कृषी उत्पन्न बाजार समितीतील धाराशिव तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री केंद्रात एकूण ९८८ शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली आहे. यापैकी शनिवारअखेर ८१ शेतकऱ्यांची १८८१ क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली. या केंद्रावरून एकूण १६३ शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीचे संदेश पाठवले आहेत. केंद्रावर मागील तीन दिवसांपासून बारदान्याचा तुटवडा जाणवत आहे. बारदाना शनिवारी संपल्यामुळे सोयाबीनची खरेदी थांबली असून, नवीन बारदाणा येईपर्यंत ही खरेदी बंदच राहणार आहे. दस्तापूर येथील केंद्रावर टॅगअभावी रखडलेली खरेदी सुरू झाली आहे दस्तापूर केंद्रावर खरेदी मंगळवारपासून (दि. २६) सुरू झाली. दस्तापूर केंद्रावर आतापर्यंत १५०० क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली आहे. टॅग नसल्याने खरेदी बंद होती. परंतु आता मंगळवारपासून वेगाने खरेदीची प्रक्रिया सुरू झाली आहे. -प्रशांत चव्हाण, चेअरमन, खरेदी केंद्र, दस्तापूर लवकरच बारदाना मिळेल, खरेदीही होईल सोयाबीनची आवक वाढली आहे. परंतु बारदाना लगेच संपल्यामुळे सोयाबीन खरेदी करता येत नाही. जास्तीत जास्त बारदाना मिळण्याची गरज आहे. सोमवारपर्यंत बारदाना मिळेल, अशी आशा आहे.

## श्री सिद्धीविनायक परिवाराकडून रक्तदान शिबिर, दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त राबवला उपक्रम



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- श्री सिद्धीविनायक परिवाराच्या वतीने संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिरात एकूण ८५ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवित मानवतेची श्रेष्ठ सेवा साकारली.

शिबिरामध्ये खामसवाडी येथील श्री सिद्धीविनायक ग्रीनटेक इंडस्ट्रीज प्रा. लि. येथून ६५ रक्तदाते, तर जिल्हा न्यायालय येथील श्रीसिद्धीविनायक मल्टीस्टेट येथील शिबिरात २० रक्तदाते सहभागी झाले. धाराशिव शहरातील सह्याद्री ब्लड बँक आणि शासकीय रक्तिपेशी यांनी पार पाडली. ग्रीनटेक इंडस्ट्रीजतर्फे कार्यकारी संचालक गणेश कामटे, संचालक प्रथमेश आवटे, बलराम कुलकर्णी, अक्षय शेळके, शेतकी अधिकारी विकास उबाळे, केन अकाउंटंट अमित कुरुळे आणि अभय शिंदे यांनी शिबिराचे मार्गदर्शन केले. तर जिल्हा न्यायालयातील मल्टीस्टेट शाखेकडून अतिरिक्त सीईओ अरविंद गोरे, शाखा व्यवस्थापक प्रज्वल जाधव, तसेच नितीन हुंबे, अविनाश पवार, रंजित भोरे यांनी सक्रिय सहभाग घेत आयोजन यशस्वी केले.

## वातावरणातील बदलाने थंडीत वाढ, सांधेदुखीच्या त्रासाने नागरिक हैराण

उमरगा (प्रतिनिधी)-थंडी हवीहवीशी वाटत असली तरी काही जणांना हवेतील गारवा वेदनादायी ठरतोय. थंडीने अनेक लोकांना सांधेदुखी आजाराचा त्रास उद्भवतो. संधिवात असलेल्या रुग्णांसाठी हिवाळ्यात थंडीचा काळ अतिशय अवघड असतो. मागील काही दिवसांपासून थंडीचा कडाका वाढतोय. पारा १५ अंश सेल्सिअसच्या खाली गेला आहे. त्यामुळे अनेकांना सांधेदुखीचा त्रास सुरू झाला आहे. गुडघे, सांध्यांच्या दुखण्यामुळे हैराण झालेले रुग्ण रुग्णालयात येत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

संधिवात व सांधेदुखीचा त्रास असलेले लोकांना हिवाळा त्रासदायक ठरतो आहे. त्यात सध्या थंडी वाढल्यामुळे सांधेदुखीनेही डोके वर काढले आहे. वातावरण बदल व थंडीमुळे होणारी सांधेदुखी आजाराचे रुग्ण गेल्या दोन आठवड्यात २५ ते ३० जणांवर रुग्णालयात औषधोपचार देण्यात आले. थंडीमुळे सांध्यातील वंगण घट्ट होते रक्त प्रवाह कमी होतो थंडीत दाह वाढतो. कॅल्शियम व्हिटॅमिन डी कमतरता होते यासाठी दूध, ताक, दही, तीळ लाडू, तीळ चटणी बदाम, अक्रोड व सूर्यप्रकाशात १५-२० मिनिट बसावे. दाह कमी करण्यासाठी मासे (ओमेगा-३), जवस, हळद, दूध, आले, लसूण, मेथी, पालक, शेवगा, गाजर दोडका, कारले, फ्लॉवर तसेच पपई, मोसंबी, संत्री, सफरचंद, डाळिंब व स्नायूंना बळ प्रोटीन डाळी, हरबरा, मूग, अंडी, सोयाबीन आहारात घेणे आवश्यक आहे.

आहारात अक्रोड, जवस, मासे समावेश करा : हिवाळ्यात थंड हवामानावर मात करायची असेल तर कपडे उबदार घालायला हवेत. घराच्याबाहेर पडताना नेहमी उबदार स्वेटर, जॅकेट, कोट, मिटन्स, मोजे आणि बूट घाला. हात आणि पाय नेहमीच उबदार असतील याची खात्री करावे. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. ओमेगा-३ फॅटी सिड्स सांध्यांची जळजळ कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. नियमित आहारात समावेश करा. दैनंदिन आहारात अक्रोड, जवस, एवोकॅडो, मासे खाणे उपयुक्त ठरेल. यामुळे थंडीच्या हवामानावर मात करण्यास मदत होईल.

## स्वच्छता केली, पण मंत्री आले नाहीत

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे शनिवारी दुपारी १ वाजता मध्यवर्ती बसस्थानकास भेट देऊन पाहणी करणार होते. मात्र, काही कारणास्तव त्यांची भेट टळली. परिवहन मंत्री येणार म्हणून बसस्थानकात अधिकारी स्वच्छतेकडे विशेष लक्ष देऊन होते. दुपारी १ वाजेपर्यंत जेसीबीच्या सहाय्याने आगारातही स्वच्छता केली जात होती. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली होती. या भेटी दरम्यान शौचालय, पाणपोईसारख्या सर्वसामान्य प्रवासी व नागरिकांनी पुरवण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी आगार व्यवस्थापकास निलंबित करण्याचे आदेश परिवहन मंत्र्यांनी दिले होते. धाराशिव येथील मध्यवर्ती बसस्थानक कार्यान्वित होऊन आता सहा महिने झाले आहेत. इमारत नवीन असली तरी बसस्थानकात साफसफाई केली जात नसल्याच्या तक्रार प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती. तसेच हिरकणी कक्षही बंद राहत असल्याची महिला प्रवाशांकडून ओरड होत होती. परिवहनमंत्री शनिवारी दुपारी मध्यवर्ती बसस्थानकास भेट देऊन पाहणी करणार होते. मंत्री येणार असल्याने एसटीचे अधिकारी सकाळपासून बसस्थानकाच्या स्वच्छेकडे लक्ष देत होते.

## आजीची केली फसवणुक:गुन्हा दाखल

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत निखली भारत समुद्र, रा. बोरगाव खु. ता. कळंब जि. धाराशिव यांचे आजीला अज्ञात दोन व्यक्तीने दि.२२.११ रोजी बोरगाव खु. येथील अंबाबाई मंदीर येथे नेवून त्यांचे हातातील ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी अंदाजे ९,००० किंमतीची फिर्यादीच्या आजीला भुरळ पाडून घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी निखील समुद्र यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे शिराढोण येथे गुन्हा नोंदवला आहे.

# तुतीची लागवड केल्यास शेतीला लागेल रेशमी झालर: कृषी अधिकारी महादेव आसलकर




लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा शेतकऱ्यांनी गट शेतीच्या माध्यमातून तुतीची लागवड करावी. तुतीच्या लागवडीतून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते. रेशीम उद्योगातून आपली प्रगती साधावी. तुमच्या शेती उद्योगाला रेशमी झालर लागेल. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारून गटशेती केल्यास लहान मोठ्या शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार असल्याचे मत उपविभागीय कृषी अधिकारी महादेव आसलकर यांनी केले आहे. कृषी विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. २७) करवंजी (ता. लोहारा) येथे तुती लागवड व गटशेती या विषयावर मार्गदर्शन सत्रात कृषी अधिकारी बोलत होते. लोहारा तालुक्यातील जय मल्हार शेतकरी गट व माऊली शेतकरी गटांसाठी कृषी विभागाच्या वतीने या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धाराशिवचे उपविभागीय कृषी अधिकारी महादेव आसलकर, सास्तुरचे कृषी मंडळ अधिकारी एम. एम. माळकुंजे, कृषी सहायक यू. एस. बिराजदार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या वेळी कृषी मंडळ अधिकारी एम. एम. माळकुंजे व कृषी सहायक यू. एम. बिराजदार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना कृषी विभागाच्या वतीने रेशीम शेती, गट शेती आणि इतर शेतीपूरक व्यवसायांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची माहितीही शेतकऱ्यांना दिली. या वेळी शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी जय मल्हार शेतकरी गटाचे अध्यक्ष शंकर देवकर, उपाध्यक्ष मारुती हाक्के, सचिव कोंडिबा पांढरे, माऊली शेतकरी गटाचे अध्यक्ष बाळू हाक्के, उपाध्यक्ष संभाजी हरेल, सचिव दीपाली देवकर यांच्यासह शेतकरी गटांच्या सदस्यांनी पुढाकार घेतला होता. रेशीम उद्योग सर्वच शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल या वेळी आसलकर यांनी तुती लागवडीचे महत्त्व, सुधारित जाती, योग्य व्यवस्थापन तंत्र अवगत केल्यास फायदा होईल. रेशीम उद्योग शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे सांगितले. लहान आणि सीमांत शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट शेती केल्यास सामूहिक शक्ती वाढते. यामुळे शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, मोठी यंत्रसामग्री वापरणे आणि उत्पादनासाठी चांगला बाजारभाव मिळवणे कसे शक्य होते. परिसरातील शेतकऱ्यांनी केला गटशेतीचा निर्धार कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी मार्गदर्शन सत्र संपन्न झाल्यानंतर करवंजी येथील जय मल्हार शेतकरी गट व माऊली गटाच्या सदस्यांनी आणि उपस्थित शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले आणि तुती लागवड व गट शेतीसारख्या संकल्पना शेतीत उतरवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# वरवंटी येथे श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त गुरूचरित्र पारायण व कीर्तन महोत्सवास प्रारंभ



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- तालुक्यातील वरवंटी येथे श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त त्रिदिवसीय हरिकीर्तन गुरूचरित्र पारायण व हरिभजन कार्यक्रमाचे दि. २ ते ४ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. गावातील श्री दत्त मंदिरात या सोहळ्यास मंगळवारी (दि.२) भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला. यानिमित्त सायंकाळी पाच वाजता श्री दत्त पालखी दिंडी प्रदक्षिणा झाली. रात्री हभप प्रमोद माने महाराज अनसुर्डेकर यांची कीर्तनसेवा झाली. त्यानंतर पंचक्रोशीतील भजनी मंडळाचा हरिजागर असे कार्यक्रम झाले.

बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी दुपारी बालाजीनगर धाराशिव येथील महिला मंडळाची भजनसेवा तर रात्री ९ वाजता हभप अभिमन्यू महाराज घाडगे खुणेश्वर यांची कीर्तनसेवा होत आहे. त्यानंतर भजनी मंडळाच्या वतीने हरिजागर करण्यात येणार आहे.

गुरूवार, दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी वरवंटी व परिसरातील महिला मंडळाची भजनसेवा होणार आहे. सायंकाळी ४ वाजता हभप ॲड. पांडुरंग लोमटे महाराज यांचे गुलालाचे कीर्तन होईल. त्यानंतर वैभव मोहन उंबरे यांच्या वतीने महाप्रसाद होणार आहे. पारायण सोहळ्यात परमेश्वर सगर, गोरोबा दंडनाईक, अंकुश देशमुख, नागेश देशमुख यांच्या वतीने अन्नदान सेवा करण्यात येत आहे. तर तीन दिवस फराळ (फलाहार) उद्धव डोंगरे, रूद्राप्पा बेद्रे, श्रीमंत पवार, चहापान बाळासाहेब देशमुख, पृथ्वीराज सगर, शहाजी बागल, यांच्यातर्फे करण्यात येत आहे. पारायण सोहळ्यानिमित्त मंदिरावर छत्रपती जमदाडे यांच्या वतीने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. व्यासपीठ चालक हभप सौ.प्रणितताई विजयकुमार देशमुख या असून अधिक माहितीसाठी दत्तसेवक दत्तात्रय पंडित व दिनकर देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

या सोहळ्यात वरवंटीसह पंचक्रोशीतील वडगाव (सि.), बावी, खामसवाडी, शेरकर वाडगा, केशेगाव, धारूर, अनसुर्डा, पळसवाडी, कामठा, ढेकरी, केकस्थळवाडी, आपसिंगा, शिराढोण, आळजापूर, मिर्झनपूर, भालगाव, उपळे (दु), बेगडा, सुर्डी, पिंपरी, कात्री पोहनेर, सांजा, गावसूद, देवळाली, उत्तमी कायापूर, राघुचीवाडी, जुनोनी येथील भजनी मंडळाचा सहभाग असल्याचे असून या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आयोजक समस्त वरवंटी ग्रामस्थांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# वर्सोवा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सहा महिन्यांच्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन

मुंबई, (प्रतिनिधी)- मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार साधण्यासाठी वर्सोवा येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन तसेच सागरी डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या सहा महिन्यांच्या १३५ व्या सत्राचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत होत असून पात्र मच्छिमारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या प्रशिक्षणात मत्स्यव्यवसाय नौकानयनाचे मूलतत्त्व, सागरी डिझेल इंजिनचे भाग, त्यांची दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने तसेच प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश आहे. दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना ४५० रुपये तर दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना १०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

या प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक असून त्याचे वय १८ ते ३५ वर्षे असावे. प्रशिक्षणार्थींना पोहता येणे बंधनकारक असून तो किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा. त्याला मासेमारीचा किमान दोन वर्षांचा अनुभव आणि बायोमेट्रिक/आधार कार्ड धारक असावा. त्याचप्रमाणे त्याच्याकडे मच्छिमार संस्थेची शिफारस असलेला परिपूर्ण अर्ज आणि दारिद्रेषेवरील असल्यास संबंधित प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

या प्रशिक्षण सत्राकरिता इच्छुक व पात्र मच्छिमारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई-१९ येथे २२ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत, असे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी स. श. भालेराव यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी सचिन भालेराव, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी (९९२०२०१२०७) आणि जयहिंद सूर्यवंशी, प्रशिक्षण निर्देशक (७५०७९८८५५२) यांच्याशी संपर्क साधावा.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

# बुलेटच्या सायलेंन्सर मोठ्याने का वाजवता असे विचारण्याचे कारणावरुन मारहाण

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अजय, विजय, दोघे रा. दत्तनगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२७.११.२०२५ रोजी २ दत्तानगर कळंब येथे फिर्यादी नामे- अभिषेक शिवाजी भाकरे, वय २४ वर्षे, रा. दत्तनगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांना नमुद दोघांनी बुलेटच्या सायलेंन्सर मोठ्याने का वाजवता असे विचारण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉडने मारहाण करुन जखमी केले.जिवे ठार मारण्याच धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अभिषेक भाकरे यांनी दि.०१.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे कळंब येथे भा.न्या. सं.कलम ११८(१),११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# भूमला कार्यालयात कर्मचारी नसतानाही जळताहेत ट्यूब

भूम(प्रतिनिधी)-भूम तालुक्यातीलच विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयांत मोठ्या प्रमाणावर विजेचा अपव्यय होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगरपरिषद, आरोग्य विभागाचे कार्यालय तसेच काही राजकीय पदाधिकाऱ्यांची कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी दिवसभर विनाकारण ट्यूब व पंखे सुरू असल्याचे चित्र दिसते. तालुक्यात महावितरणकडून दरवर्षी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीज बचतीबाबत जनजागृती केली जाते. अनावश्यक दिवे बंद ठेवा, ऊर्जेचा अपव्यय टाळा असे फलक लावले जातात आणि संदेशही दिले जातात. मात्र प्रत्यक्षात या सूचनांचे पालन सामान्य नागरिकच करताना दिसतात. शासकीय कार्यालयांत मात्र मोठ्या प्रमाणात उल्लंघन सुरू असल्याचे दिसत आहे. सामान्यांचे वीजबिल थकले तर त्याचे कनेक्शन तत्काळ तोडले जाते. मात्र प्रशासकीय कार्यालये, प्रभावशाली व्यक्तींची कार्यालये, दुकाने व कार्यक्रमस्थळांवर दिवस-रात्र वीज वापर सुरू असतो. त्याकडे प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांत आहे. सर्रास ग्रामीण भागात ग्रामपंचायतीने बसवलेले पथदिवे दिवसाही सुरू असतात. याबाबत वारंवार केल्या जात आहेत. दरम्यान, वाढती वीज मागणी, अपुरी वीजनिर्मिती आणि तांत्रिक बिघाड यामुळे भारनियमनाचा भार मात्र सर्वसामान्य शेतकरी,नागरिकांवरच टाकला जात आहे. शेतकऱ्यांना वेळेवर वीज मिळत नाही, मात्र वीज बचत करणे निर्मितीपेक्षा स्वस्त प्रत्येक कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी कार्यालयाबाहेर जाण्यापूर्वी पंखे, दिवे बंद करून जात नसल्याचे चित्र सर्रास दिसून येत आहे.

# नगरपरिषदनिहाय झालेल्या मतदानाची टक्केवारी

**नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूका-२०२५ जिल्हा धाराशिव**

| अ.क्र | नगरपरिषदेचे नाव | एकूण मतदान केंद्र संख्या | एकूण प्रभाग | एकूण मतदार | | | | निवडणुकीसाठी अंतिम उमेदवार संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | इतर | एकूण | अध्यक्ष | सदस्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | धाराशिव | 108 | 20 | 48407 | 45583 | 16 | 94006 | 6 | 201 |
| 2 | तुळजापूर | 35 | 11 | 14538 | 15017 | 6 | 29561 | 7 | 62 |
| 3 | नळदुर्ग | 20 | 10 | 8736 | 8386 | 0 | 17122 | 6 | 83 |
| 4 | उमरगा | 37 | 12 | 16231 | 15555 | 5 | 31791 | 4 | 88 |
| 5 | मुरूम | 20 | 10 | 7714 | 7205 | 1 | 14920 | 4 | 57 |
| 6 | कळंब | 24 | 10 | 10713 | 10245 | 0 | 20958 | 6 | 67 |
| 7 | भूम | 21 | 10 | 9228 | 8849 | 0 | 18077 | 3 | 42 |
| 8 | परंडा | 22 | 10 | 8622 | 8612 | 3 | 17237 | 2 | 43 |
| एकूण | | 287 | 93 | 124189 | 119452 | 31 | 243672 | 38 | 643 |

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४




## तुळजापूर येथील पी.एम.श्री.जिल्हा परिषद कन्या विद्यालय येथे मतदान केंद्रावर मतदानासाठी रांगेत उभे असलेले स्त्री आणि पुरुष मतदार

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## पाकिस्ताची पुन्हा, घुसखोरीची शक्यता

अतिरेक्याच्या जीवावर पाकिस्तानची मगरुरी चालूच आहे. एक ना एक दिवस हेच अतिरेकी जेंव्हा पाकिस्तानचा खातमा करतील त्यावेळी धार्मिकतेच्या आडून काम करणाऱ्यांचे डोळे उघडतील.सध्याला भारत जपून पावले उचलत आहे. अनेकदा विचार करीत आहेत. भारताला हिंसा नको तर शांतता हवी आहे, याचाच फायदा पाकिस्तान उचलत आहे. आता तर जम्मू व देशाच्या सुरक्षतेशी निगडित एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. भारतीय सीमा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानकडून घुसखोरीचे प्रयत्न बऱ्याच प्रमाणात कमी झाले परंतु धोका कित्येक पटीने वाढला आहे कारण पाकिस्तानने बॉर्डरवर लॉन्च पॅड आणि टेरर कॅम्प पुन्हा एक्टिव्ह केले आहेत, असा दावा काश्मीर फ्रंटियरचे आयजी अशोक यादव यांनी केला. आयजी अशोक यादव म्हणाले की, आता एलओसीवर ६९ लॉन्चिंग पॅड एक्टिव्ह आहेत. ज्याठिकाणी जवळपास १००-१२० दहशतवादी घुसखोरी करण्याची प्रतिक्षा करत आहेत. आमच्या इंटेलिजेंस युनिटने सर्व ६९ एक्टिव्ह लॉन्चिंग पॅडवर करडी नजर ठेवली आहे. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादविरोधी ऑपरेशन सिंदूर अजूनही जारी आहे. बॉर्डर सिक्युरिटी फोर्सने फॉरवर्ड एरियात सुधारणा केली आहे. ऑपरेशन आवश्यकतेसाठी नवीन तंत्रज्ञान खरेदी केले आहे. घुसखोरीच्या आव्हानाला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी बीएएसएफ लक्ष केंद्रीत करत आहे असे त्यांनी सांगितले. जम्मू काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यातील हुमहामा येथे बीएसएफ फ्रंटियर हेडक्वार्टरमध्ये माहीती देताना ते पुढे म्हणाले दहशतवादी घुसखोरीसाठी नवा मार्ग शोधत आहेत, कारण पाकिस्तानी सैन्य आणि पाक दहशतवादी संयुक्त रेकी करत आहे. परंतु भारतीय सैन्य सर्व परिसरात मजबुतीने त्यांच्यावर भारी पडत आहे. बीएसएफचे जावानाने एंटी टेरर ऑपरेशनमध्ये चांगले यश मिळवले आहे परंतु ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्याने प्रोफेशनल पद्धत अवलंबली. आम्ही अचूक टार्गेट करत शत्रूच्या ठिकाणांना उद्ध्वस्त केले. ऑपरेशन सिंदूरमध्ये सीमेपलीकडील लॉन्चिंग पॅड उद्ध्वस्त केले, तर सैन्यासोबत मिळून सीमावर्ती भाग आणि इतर भागात २२ ऑपरेशन करण्यात आले. ज्यात दहशतवाद्यांना कंठस्नानी घातले आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा सापडला असेही आयजी अशोक यादव यांनी सांगितले. दरम्यान, लष्करासोबत मिळून सीमावर्ती भागात चांगली पकड बनवली आहे. ज्यामुळे २०२५ मध्ये घुसखोरीच्या ४ प्रयत्नांमध्ये ८ दहशतवाद्यांना ठार केले. बीएसएफने देशातंर्गत भारतीय लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफसोबत मिळून २२ संयुक्त ऑपरेशन केले. ज्यात नॉर्थ काश्मीरात काही दहशतवाद्यांना मारले. आम्ही अनेकवेळा दहशतवादी हालचालींची माहिती लष्कराला दिली आहे. सध्या १५० दहशतवादी घुसखोरी करण्याच्या तयारीत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर गुलमर्ग बाउल आणि इतर संवेदनशील भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे, जेणेकरून पर्यटकांना टार्गेट करण्याचा दहशतवाद्यांचा कुठलाही प्रयत्न वेळीच हाणून पाडता येईल असेही आयजी अशोक यादव यांनी म्हटले असले तरी पुन्हा एकदा ऑपरेशन सिंदुर राबविण्याची शक्यता नाकारात येत नाही. मुळात आपल्या देशातील सीमावर्ती भागात कडक नियोजनाची गरज आहे. सीमावर्ती भागातून तसेच जंगल व झाडी मोठ्या प्रमाणात असल्याने लपून भारतात घुसखोरी केली जाते. मुळात सीमावर्ती भाग डोंगराळ तेही उंच डोंगर दऱ्याखोऱ्याचा भाग आहे. अशा ठिकाणाहूल लपून अतिरेक्याची घुसखोरी होते. त्याच प्रमाणे भारतातील स्थानिकांचा संबंध ठेऊन काही वेळा घुसखोरी होते. मुळात स्थानिक भाऊ-बंधकीचा लाभ पाक अतिरेकी घेतात हे उघड आहे. कारण भारतरातील काहीचा संबंध असल्याने अनेक अतिरेकी कारवाया यशस्वी झाल्या आहेत हे मान्यच केले पाहिजे. मुळात भारतीयाचे रक्त थंड आहे याचाच फायदा पाकिस्तानी उचलत आहेत. पाकिस्तानी नागरिक भारताला मित्र मानत नाहीत तर दुष्मन समजतात. त्यामुळे भारतीयांनी सतत जागृत राहवे लागते. भारतीय जागृत आहे का नाहीत हे परवाच्या दिल्लीतील स्फोटाच्या घटनेवरून दिसून आहे आहे. आपल्याच देशातील विद्यापीठात शिक्षण घेऊन आपल्याच देशातील नागरिकांना स्फोट घडऊन मारणे हा हिंसक प्रकार जगात पाकिस्तानी धार्जिंनीशिवाय दुसरे कोणीही करीत नाहीत. केवळ हिंसा घडविणे हा एक कलमी कार्यक्रम पाकिस्तानीचा आहे तरी भारतातील मंडळी 'एका गालात मारले तर दुसरे काल पुढे करतात' अशी मानसिकतेचे भारतीय आहेत. त्यामुळे भारतात यावे, शिक्षण घ्यावे व भारतात स्फोट घडविले जात आहेत. यापेक्षा दुसरे दुर्दैवी नाही. त्यामुळे आता तरी भारतीयांनी सावध झाले पाहिजे. आता तरी लाड कमी केला पाहिजे. नसता एक ना एक दिवस पारतंत्र्य नशीबी आल्याशिवाय राहाणार नाही. वास्तविक हिंदुस्थान हा पाकिस्तान व्हावा अशी काहीची ईच्छा आहे त्यामुळे तर पाक अतिरेकीची फावले जात आहे. भारतात घुसखोरी होते कसे? पलगाम घटना घडती कसे? यामागील भारतातील सुत्रधार असल्याशिवाय भारतात यशस्वी कामगिरी होत नाही हे तसे सर्वांना माहिती आहे. तरी भारतीय शांत आहेत. पेटून उटत नाहीत. भारतीय जर पेटून उठले तर पाकिस्तान हा बेचिराख झाल्याशिवाय राहाणार नाही. थंड रक्ताच्या मंडळींना काय म्हणावे? त्यामुळे जो पर्यंत पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशावर दिसणार आहे तो पर्यंत दहशदवाद हा संपणार नाही. अतिरक्यांना खतपाणी घालणारा म्हणजे पोसणारा देश आहे. हे जगाला माहिती असताना कोणी याबाबत गांर्भीयाने घेत नाही म्हणून आज देशात दिल्ली म्हणजे देशाच्या राजधानीत स्फोट घडविले जातात, घुसखोरी केली जाते. कितीही रोखले तर घुसखोरी चालू आहे यामुळे भारताची वचक कमी झाली आहे हे उघड दिसून येत आहे.

## हिवाळ्यात कोरड्या त्वचेला मऊ आणि चमकदार कसं बनवायचं? 'हे' घरगुती उपाय करतील मदत



हिवाळ्यात, कमी आर्द्रता आणि कोरडी हवा यामुळे त्वचा कोरडी होऊ शकते. यामुळे त्वचा निस्तेज आणि निर्जीव दिसू शकते. चेहऱ्यावरील चमक देखील कमी होते. म्हणून, हिवाळ्यात त्वचेची अतिरिक्त काळजी घेणे आवश्यक असते. बहुतेक लोक हायड्रेटिंग फेस मास्क आणि फेशियलचा अवलंब करतात.

परंतु, कोरड्या त्वचेवर उपचार करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय देखील वापरू शकता. ही उत्पादने त्वचा उजळवण्यास आणि ती चमकवण्यास मदत करू शकतात. ही उत्पादने लावल्याने डाग देखील दूर होतात. हिवाळ्यात कोरडी त्वचा मऊ आणि चमकदार कशी बनवायची ते जाणून घेऊया..

हिवाळ्यात कोरड्या त्वचेला मऊ आणि चमकदार कसं बनवायचं? हे घरगुती उपाय करतील मदत

**मध–**

मध त्वचेसाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. हिवाळ्यात तुम्ही ते तुमच्या चेहऱ्यावर वापरू शकता. मधातील मॉइश्चरायझिंग गुणधर्म त्वचेला मऊ आणि चमकदार बनवतात. हे करण्यासाठी, एक चमचा मध घ्या आणि ते चेहऱ्यावर लावा, २-३ मिनिटे हलक्या हाताने मसाज करा. १०-१५ मिनिटांनी, साध्या पाण्याने चेहरा धुवा. यामुळे रंग स्वच्छ होईल आणि त्वचा चमकेल. मध त्वचेची चमक देखील वाढवते. मधाची पेस्ट लावल्याने त्वचेच्या अनेक समस्या दूर होतात.

**बेसन–**

हिवाळ्यात तुम्ही चेहऱ्यावर बेसन देखील वापरू शकता. यासाठी २ चमचे बेसन घ्या आणि त्यात थोडे दह्याचे मिश्रण करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि १५-२० मिनिटे तसेच राहू द्या. बेसन डाग आणि मुरुमे कमी करण्यासाठी देखील प्रभावी आहे. तुम्ही ही पेस्ट दररोज वापरू शकता. यामुळे तुमच्या त्वचेची चमक देखील सुधारेल.

**केळीची पेस्ट–**

हिवाळ्यात तुमच्या चेहऱ्यावरील कोरडेपणा दूर करण्यासाठी तुम्ही केळीची पेस्ट देखील वापरू शकता. केळीमुळे त्वचा मऊ आणि चमकदार होते. अर्धे केळ घ्या आणि ते चांगले मॅश करा. पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटे तसेच राहू द्या. त्यानंतर, कोमट पाण्याने चेहरा धुवा. यामुळे तुमच्या त्वचेची चमक देखील सुधारेल. केळीची पेस्ट लावल्याने डाग दूर होण्यास मदत होते.

**पपईची पेस्ट–**

हिवाळ्यात पपईची पेस्ट लावणे देखील फायदेशीर आहे. तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर पपईची पेस्ट वापरू शकता. यासाठी, चांगली पिकलेली पपई थोडीशी घ्या आणि मॅश करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांनी सामान्य पाण्याने धुवा. पपईमध्ये असलेले गुणधर्म त्वचेवरील डाग आणि डाग देखील दूर करतात. ही पेस्ट लावल्याने त्वचेची चमक देखील सुधारते. हिवाळ्यात तुम्ही पपईची पेस्ट चेहऱ्यावर देखील लावू शकता.

**कोरफड–**

जर तुमची त्वचा हिवाळ्यात जास्त कोरडी होत असेल तर तुम्ही कोरफडीचा वापर करू शकता. कोरफडीच्या जेलमध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात जे त्वचेला आर्द्रता देतात. कोरफडीचा जेल त्वचा मऊ आणि चमकदार बनवते. हे करण्यासाठी, कोरफडीचा जेल चेहऱ्यावर लावा आणि रात्रभर तसेच राहू द्या. सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुवा. यामुळे त्वचेची चमक सुधारेल. कोरफडीचा जेल त्वचेला थंड करतो आणि जळजळ कमी करतो. कोरफडीचा जेल त्वचेची सूज कमी करण्यासाठी देखील प्रभावी आहे.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त...............

**प्रस्तावना:**

मानवाच्या जीवनात शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकांतील अक्षरे नव्हे; तर विचार, आत्मविश्वास, संस्कार आणि सामर्थ्याची शिदोरी आहे.

प्रत्येक मुलगा/मुलगी आपल्या आयुष्याची सुरुवात एकसमान स्वप्नांसह करतो/करते. परंतु काही मुलांना शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनाक्षम कमतरतेमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाते. या अंतराला शिक्षणच संपवू शकते.

पूर्वी ''अपंग'' या शब्दामुळे ही मुले दयेची, हेटाळणीची पात्र वाटत. परंतु ''दिव्यांग'' हा शब्द त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील दैवी सामर्थ्याची ओळख करून देतो. हा शब्द एका समाजाच्या दृष्टीकोनात झालेल्या सकारात्मक परिवर्तनाचा पुरावा आहे.

**१) दिव्यांगत्वाची संकल्पना आणि कायदेशीर व्याख्या:**

दिव्यांगत्वाच्या प्रमुख श्रेणींमध्ये अंधत्व व अल्पदृष्टी, कर्णबधिरता व भाषणदोष, बौद्धिक अक्षमता व मानसिक आजार, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर, शिकण्यातील अडचणी जसे की , सेरेब्रल पाल्सी, कुष्ठरोगमुक्त व्यक्ती आणि बहुविध दिव्यांगत्व यांचा समावेश होतो.

१. दिव्यांगत्वाच्या प्रमुख श्रेणी
१) अंधत्व व अल्पदृष्टी
२) कर्णबधिरता व भाषणदोष
३) बौद्धिक अक्षमता व मानसिक आजार
४) ऑटिझम
५) शिकण्यातील अडचणी ( इ.)
६) सेरेब्रल पाल्सी
७) कुष्ठरोगमुक्त व्यक्ती
८) बहुविध दिव्यांगत्व इत्यादी २१ प्रकार सांगितले आहेत.

दिव्यांगत्व ही कमतरता नसून वेगळेपण आहे. योग्य मदत मिळाल्यास हे विद्यार्थी दैनंदिन जगण्याच्याच नव्हे तर अद्वितीय कार्याच्या शिखरावर पोहोचू शकतात.

**२. दिव्यांग शिक्षणाचे सामाज–मानसशास्त्रीय महत्त्व:**

दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मसन्मान वाढतो, कारण शिक्षण त्यांना दयेची नव्हे तर सन्मानाची वागणूक मिळवून देते. शिक्षणामुळे ते स्वावलंबी होत जातात, ज्यामुळे कुटुंब आणि समाजावरच्या अवलंबित्वात लक्षणीय घट होते. प्रत्येक व्यक्तीत दडलेली क्षमता विकसित होत असल्याने कला, विज्ञान किंवा तंत्रज्ञान या कोणत्याही क्षेत्रात ते उल्लेखनीय यश मिळवू शकतात. शिक्षणामुळे भेदभाव कमी होतो आणि समाजात सहजीवनाची संस्कृती दृढ होते.

**३. दिव्यांग शिक्षणाचे सकारात्मक परिणाम:**

दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मसन्मान वाढतो, कारण शिक्षण त्यांना दयेची नव्हे तर सन्मानाची वागणूक मिळवून देते.शिक्षणामुळे ते स्वावलंबी होत जातात, ज्यामुळे कुटुंब आणि समाजावरच्या अवलंबित्वात लक्षणीय घट होते. प्रत्येक व्यक्तीत दडलेली क्षमता विकसित होत असल्याने कला, विज्ञान किंवा तंत्रज्ञान या कोणत्याही क्षेत्रात ते उल्लेखनीय यश मिळवू शकतात. शिक्षणामुळे भेदभाव कमी होतो आणि समाजात सहजीवनाची संस्कृती दृढ होते. शिक्षणामुळे दिव्यांग विद्यार्थी निर्भरतेतून स्वाभिमानाकडे प्रवास करतात.

**४. दिव्यांग शिक्षणातील मुख्य संकल्पना**

समावेशक शिक्षण–

समावेशक शिक्षणामध्ये दिव्यांग व सामान्य विद्यार्थी एकाच वर्गात समान संधींनी शिकतात, ज्यामुळे ''तो वेगळा आहे'' ही भावना कमी होऊन ''तो माझ्यासारखाच आहे'' हा स्वीकार वाढतो.

विशेष शिक्षण–

विशेष शिक्षण त्या विद्यार्थ्यांसाठी असते, ज्यांना वयोमानापेक्षा भिन्न गती व पद्धतीने शिकणे आवश्यक असते; अशा शाळांमध्ये त्यांच्या गरजांनुसार अनुकूल वातावरण आणि आवश्यक शैक्षणिक तज्ञ उपलब्ध असतात.

वैयक्तिकृत शिक्षण योजना –

म्हणजे प्रत्येक मुलाच्या बुद्धिमत्ता, आवडीनिवड, कौशल्ये आणि अडचणी लक्षात घेऊन केलेली एक वैयक्तिक शिकण्याची योजना असून, ती विद्यार्थ्याला ''आपल्या पद्धतीनं शिकण्याची'' स्वायत्तता देते.

**५. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा**

भौतिक सुविधा–
रॅम्प, रेलिंग, लिफ्ट
सर्वसमावेशक पायाभूत सुविधा
शैक्षणिक साधने–
ब्रेल, श्रवणयंत्र,
टच-स्क्रीन, व्हॉईस टेक्नॉलॉजी
मूल्यमापन सुविधा–
लेखक/वाचक सहाय्य
अतिरिक्त वेळ
अनुकूल प्रश्नपत्रिका
आर्थिक सुविधा–
शिष्यवृत्ती, वाहतूक, निवास
वैद्यकीय सुविधा

**६. शिक्षकांची भूमिका व प्रशिक्षण:**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षक केवळ ज्ञान देणारा नाही, तर आशेचा किरण दाखवणारा जीवनदृष्टिदाता आहे.

**कर्तव्ये–**

१) शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांशी नेहमी संवेदनशील आणि संयमाने वागले पाहिजे.

२) त्यांनी विद्यार्थ्यांचे दोष न पाहता, त्यांच्या सामर्थ्यांची ओळख करून ते विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

३) विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्रत्येक छोट्या यशाचेही कौतुक केल्यास त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

४) शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत सामायिक प्रयत्न केले पाहिजेत.

७.मुख्य योजना
१) शालेय शिष्यवृत्ती
२) उच्च शिक्षण शिष्यवृत्ती
३) वाचक व प्रकल्पभत्ता
४) स्वयंरोजगार योजना
५) व्यावसायिक प्रशिक्षण

दिव्यांग विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या साहाय्याने रोजगारक्षम बनवून स्वाभिमानाने जगण्यास सक्षम करणे, हे सर्व शैक्षणिक योजनांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

८. कायदे व धोरणे
८.१ दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६
८.२ राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०
८.३ शासकीय सेवेत ४% आरक्षण
८.४ सार्वजनिक ठिकाणी अडथळामुक्त वातावरण

ही धोरणे दयेवर नव्हे, हक्कांवर आधारित आहेत.

९. आजची स्थिती व आव्हाने

ग्रामीण भागात अद्याप आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे, प्रशिक्षित विशेष शिक्षकांचे प्रमाण अपुरे असणे, पालक व समाजाला योजनांची आणि अधिकारांची पुरेशी माहिती नसणे, काही ठिकाणी भेदभाव कायम असणे आणि डिजिटल साधनांअभावी शिकण्यात अडथळे येणे ही प्रमुख आव्हाने आहेत.

१०. सकारात्मक बदल
मानसिकता बदलते आहे
सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत

**आव्हाने–**
१) ग्रामीण भागात सुविधा अपुऱ्या
२) विशेष शिक्षकांचे प्रमाण कमी
३) माहितीचा अभाव
४) अजूनही काही समाजगटांत भेदभाव
५) डिजिटल

**''कायदे बदलले; आता मन बदलणे बाकी आहे.''**


११. सुधारणा व उपाययोजना
११.१ जनजागृती
११.२ सर्व शाळांमध्ये समावेशकता
११.३ तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर
११.४ शिक्षक प्रशिक्षण बळकट करणे
११.५ पालक-शिक्षक संवाद वाढवणे
११.६ संसाधन केंद्रे स्थापन करणे
१२. प्रेरणादायी उदाहरणे

सुदा चंद्रन, हेलन केलर आणि निक व्हुजिसीक यांसारख्या व्यक्तींनी परिस्थिती आणि शारीरिक मर्यादा यांना आव्हान देत मोठे यश मिळवले; मर्यादा ही फक्त मनात असते, हे त्यांनी सिद्ध केले. दिव्यागता ही मर्यादा नाहीत; फक्त लक्षात आणून देणारे व मार्गदर्शन करणारे हात हवेत हे या व्यक्तींनी सिद्ध केले

**१३. निष्कर्ष**

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये दृढ मनाचे पर्वत असतात,जोपर्यंत त्यांना ढकलणारा हात, समजून घेणारा शिक्षक आणि स्वीकारणारा समाज मिळत नाही तोपर्यंत ते अदृश्य राहतात. दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान एकाच वाक्यात ''दया नाही संधी द्या!'' व्यक्तीची क्षमता दडपून ठेवणारी प्रत्येक भिंत शिक्षणाने पाडूया, हीच खरी समतोल समाजाकडची वाटचाल! अंतिम संदेश ''दिव्यांग नव्हे, सक्षम फक्त संधी हवी.''

''शिक्षण प्रत्येकासाठी कारण भविष्य कोणाचेही असू शकते!''



**डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**मो. ९६३७१९३०३०**

## गर्लफ्रेंड किंवा बॉयफ्रेंड व्हॉट्स ॲपवर केले ब्लॉक तुम्ही स्वत:ला करु शकता या तीन स्टेपमध्ये अनब्लॉक

व्हॉट्सॲपवर ब्लॉक करण्याचा खेळ खूप जुना आहे. गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंडमध्ये थोडेफार मतभेद झाले असतील, तर दोघांपैकी एक दुसऱ्याला व्हॉट्सॲपवर ब्लॉक करतो. तुम्हालाही एखाद्याने ब्लॉक केले असेल, तर आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही.

कारण इथे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की व्हॉट्सॲप ब्लॉक झाल्यास ते कसे अनब्लॉक करायचे. ज्याचे अनुसरण करून तुम्ही काही मिनिटांत स्वत:ला अनब्लॉक करू शकता.

सर्वप्रथम, समोरच्या व्यक्तीने तुम्हाला ब्लॉक केले आहे की नाही याची खात्री करा. प्रथम संदेश पाठवण्याचा प्रयत्न करा. जर तुम्हाला डबल टिक दिसत नसेल आणि सिंगल टिक दिसत असेल तर समजून घ्या की समोरच्या व्यक्तीने तुम्हाला ब्लॉक केले आहे. समोरच्या व्यक्तीचा फोन बंद असण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत तुम्हाला कॉमन फ्रेंडकडून कन्फर्मेशन मिळू शकते. जर तुम्हाला ब्लॉक केले असेल, तर तुम्ही स्वत:ला अशा प्रकारे अनब्लॉक करू शकता.

या ट्रिकने स्वत:ला करा अनब्लॉक

स्टेप १: सर्व प्रथम, व्हाट्सएप सेटिंग्जवर जा आणि नंतर ''खाते हटवा'' पर्याय निवडा. होय, तुम्ही ते बरोबर वाचले आहे. आता तुमच्या फोनवर ॲप पुन्हा इंस्टॉल करा आणि तुमचे खाते पुन्हा तयार करा.

स्टेप २: ॲप पुन्हा इंस्टॉल केल्यानंतर, ज्यांनी तुम्हाला ब्लॉक केले आहे त्यांना तुम्ही संदेश पाठवू शकाल.

स्टेप ३: लक्षात ठेवा, जर तुमचे व्हॉट्सॲप खाते हटवले गेले, तर तुम्हाला सर्व व्हॉट्सॲप ग्रुपमधून काढून टाकले जाईल. त्यामुळे तुम्हाला पुन्हा त्यांच्यात सामील व्हावे लागेल किंवा ते ग्रुप तुमच्यासाठी महत्त्वाचे नसतील, तर तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकता.

तुम्ही तुमच्या सामान्य मित्रांपैकी एकाला एक ग्रुप तयार करण्यास सांगू शकता, ज्यामध्ये तुमचा आणि त्या व्यक्तीचा समावेश आहे. अशा प्रकारे तुम्ही ग्रुपमधील त्या व्यक्तीला मेसेज पाठवू शकाल आणि तो तुम्हाला अनब्लॉक करण्याची शक्यता आहे.

## फळांवर का असतात स्टिकर्स, हे तुम्हाला माहीत आहे का

तुम्हीही जेव्हा तुम्ही फळे आणि भाजीपाला घेण्यासाठी बाजारात जाता, तेव्हा काही फळे साधारणपणे गाडीवर ठेवलेली असतात, तर काही फळे गाडीवर सजवून त्यावर स्टिकर्स लावलेले असतात. ही फळे गाडीवर ठेवलेल्या इतर फळांपेक्षा वेगळी दिसतात. या स्टिकर्सकडे पाहून बहुतेकांना वाटते की त्यांची गुणवत्ता अधिक चांगली असेल. हे प्रीमियम दर्जाचे असतील आणि पुन्हा बाहेरून आयात केले गेले आहेत. पण एक गोष्ट मान्य करावी लागेल की स्टिकर्स असलेली फळेही खूप महाग दिसतात. बरे वाटावे म्हणून अनेक वेळा लोक ही फळे खरेदी करतात. फळ विक्रेतेही लोकांच्या या मानसिकतेचा पुरेपूर फायदा घेत प्रीमियम दर्जाचा दावा करून परदेशातून आयात करून तुमची फसवणूक करतात.

पण तुम्ही कधी विचार केला आहे का की हे स्टिकर्स लावण्याचा अर्थ काय आहे वास्तविक, या स्टिकर्सचा निर्यात-आयात किंवा फळांच्या किमतीशी काहीही संबंध नाही, उलट त्याचा थेट संबंध तुमच्या आरोग्याशी आहे. फळांवरील स्टिकर्सचा तुमच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो ते आम्ही तुम्हाला सांगतो.

जर तुम्हाला सफरचंद किंवा संत्र्यावर ४ अंकी स्टिकर दिसला, तर ते खरेदी करण्यापूर्वी काळजी घ्या. या ४ अंकी काड्यांवरील संख्या देखील ४ ने सुरू होते. अशी फळे पिकवताना कीटकनाशके आणि रसायनांचा वापर करण्यात आला आहे. हे आकडे फळांची गुणवत्ता दर्शवतात. तुम्हाला ही फळे थोडी स्वस्तात मिळू शकतात, पण ते तुमच्या आरोग्यासाठी चांगल्यापेक्षा जास्त हानी पोहोचवू शकतात.

काही फळांच्या स्टिकर्सवर ५ अंकी क्रमांक लिहिलेले असतात. ज्या स्टिकर्समध्ये ५ अंक आहेत ते ८ ने सुरू होतात. ८२१३१ किंवा ८७५१२ प्रमाणे, याचा अर्थ असा होतो की अशी फळे अनुवांशिकरित्या सुधारित केली जातात. म्हणजे ही फळे नैसर्गिक नसून ती प्रयोगशाळेत उगवली गेली आहेत. अशा फळांची किंमत जास्त असते. जर आपण त्याच्या आरोग्यावरील परिणामाबद्दल बोललो, तर त्याचे काही फायदे आहेत आणि काही तोटे देखील आहेत.

आता जाणून घेऊया कोणती फळे खरेदी करावीत. जी फळे चांगली असतात त्यांना ५ अंकी स्टिकर्स असतात आणि ते ९ ने सुरू होतात. ९ पासून सुरू झालेली ही फळे रासायनिक आणि कीटकनाशकांशिवाय सेंद्रिय पद्धतीने तयार केली जातात. आम्ही तुम्हाला सांगतो की या फळांची किंमत थोडी जास्त असते, पण ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात.

## केस वेगाने वाढण्यासाठी मदत करते जास्वंद तेल, घरी कसे बनवायचे जाणून घ्या

जास्वंदचे फूल हे अनेक गोष्टींसाठी देखील वापरले जाऊ शकते. ते त्वचा आणि केसांसाठी खूप फायदेशीर आहे. जर आपण त्याच्या तेलाबद्दल बोललो तर ते केसांच्या अनेक समस्या दूर करण्यास मदत करते.

जास्वंदचे तेल वापरल्याने केस गळण्याची समस्या दूर होते आणि जर केस वाढत नसतील तर केस वाढू लागतात. तुम्ही हे तेल काही घटकांच्या मदतीने घरी देखील बनवू शकता. घरी जास्वंदचे तेल कसे बनवता येते आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घेऊया.

केस वेगाने वाढण्यासाठी मदत करते जास्वंद तेल, घरी कसं बनवायचं जाणून घ्या

जास्वंदचे तेल कसे बनवायचे?

. नुसार, सर्वप्रथम ८ जास्वंदची फुले आणि ८ पाने घ्या आणि त्यांची बारीक पेस्ट बनवा.

-एक कप खोबरेल तेल गरम करा आणि त्यात पेस्ट घाला.
-काही वेळ गरम होऊ द्या आणि नंतर थंड होऊ द्या.
-आता हे तेल वापरण्यासाठी तयार आहे.
-डोक्याला १० मिनिटे मसाज करा आणि अर्धा तास राहू द्या.
-यानंतर, डोके धुवा.

केसांसाठी जास्वंदच्या तेलाचे फायदे-

-हे तेल केसांच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहे. ते केस गळणे थांबवते आणि चांगले आणि चमकदार केस मिळविण्यास मदत करते.

जास्वंदच्या फुलांचे तेल केसांना वाढवते.
जास्वंदच्या फुलांचे तेल केसांमधील कोंडा दूर करते.
जास्वंदच्या फुलांचे तेल केसांना मॉइश्चरायझ करते.

केस धुण्यापूर्वी तुम्ही हे तेल प्रत्येक वेळी वापरू शकता परंतु लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही ते नियमितपणे वापरता आणि योग्यरित्या मालिश करता तेव्हाच तुम्हाला त्याचे फायदे मिळण्यास सुरुवात होईल.

## दयानंद शिक्षण संस्था परिसरात क्रीडाज्योत मशाल रॅलीचे भव्य स्वागत



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, प्र.कुलगुरु, डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ७वा. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान संपन्न होत आहे. या महोत्सवाच्या जनजागृती करिता विद्यापीठातुन रॅली लातूर जिल्ह्यातील दयानंद शिक्षण संस्थेत आली असता या भव्य रॅलीचे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गणेश लहाने, समन्वयक डॉ. संतोष पाटील यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार सदस्य डॉ. केशव अलगुले, जिल्हा समन्वयक डॉ. बालाजी होकरणे यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले. ही रॅली दयानंद मुख्य प्रवेशद्वारापासुन सर्व महाविद्यालयांना भेट देत क्रीडा महोत्सवाची जनजागृती करण्यात आली. समाजातील तरुणांनी जागरुक राहुन आरोग्यदायी, व्यसनमुक्त आणि राष्ट्र निर्मितीत सक्रीय योगदान द्यावे. तसेच नारीचा सन्मान व्हावा व राष्ट्राचा अभिमान वाढावा, स्त्री आत्मनिर्भर बनावी, देश प्रगतीपथावर जावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेतील प्रा.डॉ. वाघमारे, डॉ. शर्मा, डॉ. कोल्हे, प्रा. राजकुमार मोरे व बहुसंख्येने विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी साधला नागरिकांशी संवाद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि.०२ डिसेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी,काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला.अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रनाचा तसेच निवेदनाचा स्वीकार करीत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधिताना सूचना केल्या.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे,विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल,ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे,डॉ.अशोक आरदवाड,डॉ. मुकुंद भिसे,सुधीर गोजमगुंडे, सुदर्शन बिराजदार, संजय निलेगावकर,अमर राजपूत,व्यंकटेश पुरी, आर.बी.पाटील,अक्षय शहरकर,पिराजी साठे,बंकट पवार, अभिषेक पतंगे, मोहन सुरवसे, विवेक गवळी, शिवकांत सारगे,बादल शेख,डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ.व्यंकट येलाले, डॉ. अभय ढगे, सचिन सुरवसे, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

# मुंडे साहेबांनी मान्यता दिलेल्या शाळेकडे रमेशआप्पा कधीच दुर्लक्ष करणार नाहीत

## पानगावच्या उर्दू शाळेत ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यात पर्यायाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे वारसदार म्हणून रमेशआप्पा कराड साहेब काम करीत आहेत. त्यामुळे या भागाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच स्व. मुंडे साहेबांनी मान्यता दिलेल्या पानगावच्या उर्दू शाळेकडे कधीच दुर्लक्ष करणार नाहीत या शाळेच्या प्रगतीसाठी निश्चितपणे मदत केली अशी ग्वाही भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी दिली.



रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील लोकसेवा संस्था संचलित मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थेचे उपाध्यक्ष अब्दुल कादर महेमूदमिया आणि सहसचिव रफिक रहीमखा पठाण यांच्या वतीने भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा, माजी सरपंच सुकेश भंडारे, भाजयुमोचे मंडल अध्यक्ष अमरसिंह चव्हाण, खैसरउद्दीन काजी, आयुब मणियार, शब्बीर शेख, उपसरपंच रमाकांत वाघमारे, माजी उपसरपंच पैगंबर शेख, संस्थेचे अब्दुल कादर, रफिक पठाण, मुअ शबाना अंजुम खुर्शीद यांच्यासह पालक, विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मौलाना अब्दुल कलाम उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यात येत असल्याने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे समाधान व्यक्त करून युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, या संस्थेच्या ज्या काही अडचणी असतील त्या निश्चितपणे लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड साहेब यांच्या माध्यमातून त्याची निश्चितपणे सोडवणूक केली जाईल. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शिक्षकांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधावी असे बोलून दाखवले.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक आयुब मणियार यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेच्या कामकाजाचा आढावा दिला. यावेळी सुकेश भंडारे, जलील आत्तार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र उकंडे यांनी केले तर शेवटी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे शहराध्यक्ष इस्माईल मणियार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. एस. आर. शेख, मारुती गालफाडे, गोविंद नरहरे, शफिक पठाण, इस्माईल मणियार, ज्ञानोबा गुडे, शिवाजी जाधव, महादू फुले, दिगंबर येडले, समशेर पठाण, शेख इलाई, इनुस मणियार, जुबेर मणियार, राहुल मोटाडे यांच्यासह उर्दू शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी पालक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केअर रेटिंग्जकडून महापारेषणला ‘AA-’; आर्थिक विश्वसनीयतेत मोठी वाढ, ग्रिड क्षमता आणि व्यवस्थापनाला मोठी मान्यता

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) आणखी एक उल्लेखनीय यश मिळवले आहे. प्रतिष्ठित केअर रेटिंग्ज लिमिटेडने कंपनीचा क्रेडिट रेटिंग A+ वरून AA- पर्यंत उंचावला आहे. या सुधारित रेटिंगमुळे महापारेषणची आर्थिक विश्र्वासार्हता अधिक बळकट झाली असून आगामी काळात अनुकूल अटींवर गुंतवणूक उभारणीस मदत होणार आहे. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली आणि संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने ही चमकदार कामगिरी केली आहे.

महापारेषणची मजबूत आर्थिक कामगिरी, उत्कृष्ट वीजवहन व्यवस्थापन तसेच उच्च कार्यक्षमतेच्या ग्रिड क्षमतेमुळे हे यश मिळाल्याचे केअर रेटिंग्ज लिमिटेडने कळविले आहे. चालू वर्षात कंपनीच्या कार्यक्षमतेत मोठी सुधारणा झाली आहे. मजबूत कॅशफ्लो, कमी कर्जभार आणि ९९% पेक्षा जास्त प्रणाली उपलब्धता ही कंपनीची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत.

महापारेषणने राज्यातील वीजवहन प्रणालीचा दर्जा उंचावण्यासाठी मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण, उपकेंद्राचे सक्षमीकरण तसेच भविष्यातील ऊर्जे साठी ग्रिड क्षमतेचा विस्तार अशा महत्त्वांच्या उपक्रमांना गती दिली आहे.

केअर रेटिंग्ज लिमिटेडने महापारेषणचे दीर्घकालीन महसूल स्थैर्य, मजबूत कार्यप्रणाली, शासकीय मालकी आणि महाराष्ट्राच्या ऊर्जा पायाभूत सुविधांतील महत्त्वपूर्ण भूमिकेचा विशेष उल्लेख केला आहे. महापारेषणच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## इस्रोचे अध्यक्ष डॉ. नारायणन यांच्या हस्ते लातूरचे विकास उगले यांना पीएचडी प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील रहिवाशी विकास वसंतराव उगले यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग ) या विषयात पीएच. डी. मिळवली आहे.

ही पदवी त्यांना व्हीलटेक रंगराजन डॉ. सगुंथला आर आणि पी इन्स्टिट्यूट ऑफ टेकक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी चेन्नई येथील पदवीदान समारंभात इस्रोचे अध्यक्ष डॉ. नारायणन यांच्या हस्ते विकास वसंतराव उगले यांना प्रदान करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे कुलगुरू तसेच विविध अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. विकास उगले यांनी आपल्या संशोधनात मार्गदर्शन करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत.





विकास उगले यांनी संशोधन क्षेत्रात विशेष कामगिरी बजावली असून त्यांनी विविध तंत्रज्ञाशी संबधित प्रकल्पावर कार्य केलेले आहे. त्यांनी यांत्रिकी, अभियांत्रिकी, मशीन लर्निंग या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. विकास उगले हे सध्या पुणे येथील आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी विविध शोध विषयावर संशोधन करून देश आणि जागतिक स्तरावर संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. विकास उगले यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये आपली संशोधन पत्रे सादर केली असून त्यांना मान्यता प्राप्त झाली आहे. विकास उगले यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लातूर येथेच झाले आहे. त्यानंतरचे यांत्रिकी अभियांत्रिकीचे शिक्षण पुणे येथील वाडिया कॉलेज येथे झाले.त्यानंतर थर्मल अभियांत्रिकीत एमटेक पर्यंतचे शिक्षण मुंबई येथे झाले. आणि आता त्यांनी वेलतेक डॉ. रंगराजन सगुंथला संशोधन विकास विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था चेन्नई येथून पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. विकास उगले हे एका स्वातंत्र्य सैनिकांचे नातू असून त्यांचे वडील आणि भाऊ विधिज्ञ आहेत. त्यांच्या या यशाबद्दल लातूरचे माजी खासदार, माजी नगराध्यक्ष व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, ॲड. सुधाकर आवाड, ॲड. भगवानराव साळुंके, नाशिकचे न्या. अमर काळे, सिजीएम न्या. इगतपुरी, अंजली काळे, मुंबई हायकोर्टाचे ॲड. वैभव उगले, मुंबई येथील डीवायएसपी राजेंद्र उगले, डॉ. स्वप्नील व्यवहारे, डॉ. सूर्या व्यवहारे, नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमप, ॲड. श्रीमंत भोसले, ॲड. शिवाजीराव कानवटे, ॲड. डी. पी. शिरूरे, ॲड. चिखलीकर, ॲड. एस. पी. लामतुरे, ॲड. पी. आर. केदार, ॲड. कुळकर्णी, ॲड. चौधरी, ॲड. बनसोडे, डॉ. धनंजय गिरी आदी मान्यवरांनी विकास उगले यांचे अभिनंदन केले आहे.

# कृषीपंपांना कॅपॅसिटर बसवा, रोहीत्रे व वीजयंत्रणेची हानी टाळा, महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

**धाराशिव/प्रतिनिधी :** रब्बीचा हंगाम सुरू झाला की कृषीपंपाचा वापर वाढत जातो. अनेकदा रोहीत्रांसोबतच पाण्याची मोटर जळाल्याच्या तक्रारी वाढत जातात. विजेचा भार नियंत्रीत करणारे कॅपॅसीटरचा वापर फार कमी शेतकरी करतात त्याचबरोबर ॲटोस्विचचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. परिणामी अचानक विजेचा भार वाढल्याने वीज यंत्रणे सोबतच पाण्याची मोटर जळण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपाचा वापर योग्य ते कॅपॅसीटर लावूनच करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने बहूतांश शेतकरी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील अनेक कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे,





वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होणे तसेच पाण्याची मोटर जळन्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान होवू नये तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवावेत.

कॅपॅसिटरची गरज का? प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसविणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे योग्य दाबाचा वीजपुरवठा होतो, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होते. मात्र बहुतांश शेतकऱ्यांनी कृषिपंपास कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली आहे. त्यामुळे ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे. कृषिपंपास कॅपॅसिटर बसविल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात. पुरेशा दाबाने वीज पुरवठा मिळतो, कृषिपंप जळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच रोहित्रांवरील भार ३० टक्क्यांने कमी होऊन रोहित्र नादुरुस्तीचे व जळण्याचेही प्रमाणही कमी होते. यामुळे शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य आर्थिक नुकसान टाळता येते. योग्य दाबाचा, अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळतो. या सर्वांचा लाभ शेतकऱ्यांना होणार असल्यामुळे त्यांनी कॅपॅसिटरचा वापर नचुकता करावा.

**ऑटोस्विचचा वापर टाळावा**

राज्यात ४५ लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून शेतकऱ्यांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावले असल्याचे दिसून येते. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच लावू नये तसेच इतर शेतकऱ्यांनी ते लावले असल्यास त्वरीत काढून टाकावेत असे आवाहन महावितरणने केले आहे.

## महात्मा ज्योतीबा फुले यांना अभिवादन




मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ शाखा धाराशिवच्या वतीने महान समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त धाराशिव येथील महात्मा फुले चौकात महात्मा फुले यांच्या पुतळयास पुष्प वाहून त्यांना त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे अरुण बनसोडे, प्रभाकर बनसोडे, राजेंद्र धावारे, विजय गायकवाड, अशोक बनसोडे, बाळासाहेब माने इत्यादी उपस्थित होते.

## सोलापूर–अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या अतिरिक्त ८ फेऱ्यांसाठी सुरू राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** खाली दिलेल्या तपशीलांनुसार सोलापूर आणि अनकापल्ली दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा रेल्वे सुरू ठेवणार आहे:

सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या (८ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०१४७७ सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या २८.११.२०२५ पर्यंत चालवण्याची सूचना देण्यात आली आहे, आता ५.१२.२०२५ ते २६.१२.२०२५ पर्यंत दर शुक्रवारी चालवण्यात येणार आहेत. (४ फेऱ्या)




– ट्रेन क्रमांक ०१४७८ अनकापल्ली-सोलापूर साप्ताहिक विशेष गाड्या २९.११.२०२५ पर्यंत चालवण्याची सूचना देण्यात आली आहे, आता दर शनिवारी ६.१२.२०२५ ते २७.१२.२०२५ पर्यंत चालवण्यात येणार आहेत. (४ फेऱ्या)


वरील गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष गाड्यांच्या ०१४७७/०१४७८ च्या सततच्या फेऱ्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर उघडेल.

अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि णढड ॲपद्वारे देखील करता येते.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९